# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२१ दि. ०८ जानेवारी, २०२१

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

**जळगाव दि.०८ (प्रतिनिधी) शुक्रवार दि.१५ जानेवारी रोजी ग्रामपंचायत निवडणूकीसाठी मतदान असल्यामुळे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्व अभ्यासक्रमांच्या शुक्रवार, दि.१५ जानेवारी रोजी आयोजित ऑनलाईन परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.**

विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील कला,विज्ञान व वाणिज्य पदवी, व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत सत्र- २, ४ व ६ या सत्रातील बॅकलॉग विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन एमसीक्यु स्वरूपात दि. ५ जानेवारी पासून सुरू आहेत. ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक-२०२० जाहीर झाली असून शुक्रवार दि.१५ रोजी मतदान होणार आहे. परीक्षार्थी विद्यार्थी व संबंधित घटक मतदानापासून वंचित राहू नये म्हणून दि.१५ जानेवारी रोजी विद्यापीठामार्फत आयोजित सर्व अभ्यासक्रमांची परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून सदर दिवसाच्या अभ्यासक्रमनिहाय परीक्षांच्या तारखा लवकरच कळविण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी कळविले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या जळगाव, धुळे व नंदूरबार या तीन जिल्ह्याच्या आवृत्तीतून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(प्रमोद चव्हाण)

जनसंपर्क अधिकारी यांच्या करीता